MAHBIL03429/13/1/2000-TC खाजगी वितरणासाठी वर्ष: आठवे । अंक: बारावा । एप्रिल, २००९

CIDCO Nirmiti
A NEWSLETTER



03 सिडकोच्या सुसज्ज सभागृहाचे उद्घाटन संपन्न

04 सिडको नवी मुंबई फेस्टिव्हल २००९ सिडको अधिकारी व कर्मचाऱ्यांचे भरीव योगदान



05 खांदा कॉलनी, नवीन पनवेल व नेरुळ पामबिच मार्गालगतच्या अनधिकृत बांधकामांवर सिडकोची धडक कारवाई



06 सिडको कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, नवीन औरंगाबाद - नूतन जागेत स्थलांतर

# सिडको भवनात जागतिक महिला दिन मेळावा उत्साहात साजरा

'मुलींविषयी हजारो वर्षांपासून समाजाने जे बुरसटलेपण स्वीकारले होते त्या सनातन विचारप्रवाहाला छेद देऊन आत्मसन्मान आणि आत्मविश्वासानं ठासून भरलेलं व्यक्तिमत्व प्रत्येकीनं आपल्या मुलीत फुलवलं पाहिजे. प्रत्येक स्त्रीने स्वावलंबनाचं असं काही बाळकडू आपल्या मुलीला पाजावं की ती आयुष्यातल्या प्रत्येक प्रसंगाला धिरोदात्त उभी रहायला हवी; या बाबत किरण बेदी यांचं उदाहरण आपल्यापुढे आहेच' असे प्रतिपादन फ्युचर आयडिया-ग्रुपच्या उपव्यवस्थापक आणि बचत गट व गृहउद्योगाच्या माध्यमातून स्त्री स्वावलंबनाची चळवळ उभारणाऱ्या **श्रीमती अनिता पगारे** यांनी केले. **दि. २६ मार्च २००९** रोजी सिडको भवनात महिला दिनानिमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या जागतिक महिलादिन मेळाव्यात त्या बोलत होत्या.

या प्रसंगी सिडकोचे अध्यक्ष मा. **श्री. नकुल पाटील** प्रमुख पाहुणे म्हणून तर सहव्यवस्थापकीय संचालक **श्री. दिलीप जाधव** व महिला बचत गट आणि शिक्षण क्षेत्रात स्वयंसेवी संघटनेद्वारा कार्यरत असणाऱ्या व सहव्यवस्थापकांच्या अर्धांगिणी **श्रीमती विजया जाधव** यांची विशेष अतिथी म्हणून उपस्थिती लाभली.

**श्रीमती विजया जाधव** यांनी आपल्या कार्याविषयी थोडक्यात माहिती देऊन उपस्थितांना मार्गदर्शन करतांना सांगितले की 'आजच्या पिढीची चंगळवादाकडे होणारी वाटचाल चिंताजनक आहे, त्यामुळे या पिढीला संस्कारांचं संचित पुरवण्याची जबाबदारीदेखील स्त्रियांनाच प्रामुख्याने सांभाळावी लागणार'.

या प्रसंगी सिडको एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष **श्री. निलेश तांडेल** आणि सरचिटणीस **श्री. मिलिंद बागुल** यांनीही मनोगत व्यक्त केले. सिडको सभागृहाचे नूतनीकरण करून सिडकोला हक्काचे व अद्ययावत सभागृह उपलब्ध करून देणाऱ्या वरिष्ठ वास्तुशास्त्रज्ञ **श्रीमती शिल्पा अवटी,** कार्यकारी अभियंता **श्री. परमार** यांचा सहव्यवस्थापकीय संचालक **श्री. दिलीप जाधव** यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची सुरूवात झाली. प्रारंभी **श्रीमती अमरजा चव्हाण, श्रीमती सुवर्णा जोग, श्रीमती रचना म्हात्रे, श्रीमती मीरा सावंत** (हार्मोनियम) व **श्री. मंगेश धोत्रे** (तबला) यांच्या चमूने इशस्तवन सादर केले. तदनंतर **श्रीमती सुनंदा पाटील** लिखित व **श्रीमती मिनाक्षी तांडेल, श्रीमती सुवर्णा जोग, श्रीमती बंगाली** व **श्रीमती अमरजा**



**चव्हाण** अभिनित 'अरे संसार संसार' ही नाट्यछटा सादर करण्यात आली. तसेच **श्रीमती सुनंदा पाटील** व **श्रीमती विद्या तांबवे** यांनी 'तुझ्या गळा माझ्या गळा' हे विनोदी प्रहसन सादर केले. तर **श्रीमती प्राजक्ता ठाकूर, श्रीमती अनुपमा आकरे, श्रीमती प्रतिभा भोईर, श्रीमती सुवर्णा जोग, श्री. धनंजय सुगवेकर** (हार्मोनियम) व **श्री. मंगेश धोत्रे** (तबला) यांनी आपल्या गायनाने श्रोत्यांना मंत्रमुग्ध केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्य सामाजिक सेवा अधिकारी **श्रीमती रीमा दीक्षित, श्रीमती कर्णिक** व त्यांचे सहकारी, उद्यान अधिकारी















**श्री. टी. आर. कांबळे** व त्यांचे सहकारी यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

कार्यक्रमाचे प्रास्तविक **श्रीमती अनिता उरणकर,** प्रमुख पाहुण्यांचा परिचय **श्रीमती अमरजा चव्हाण,** सूत्रसंचालन **श्रीमती रचना म्हात्रे** आणि आभार प्रदर्शन **श्रीमती मिनाक्षी तांडेल** यांनी केले.

या कार्यक्रमाला व्यवस्थापक (कार्मिक) **श्री. दि. अ. करंदीकर,** सिडकोतील समस्त संघटनांचे प्रतिनिधी यांच्याबरोबरच सिडकोच्या अधिकारी व कर्मचारी वर्गाची उत्स्फुर्त उपस्थिती लाभली.











# सिडकोच्या सुसज्ज सभागृहाचे उद्‌घाटन संपन्न

सिडकोच्या विविध समारंभांना अधिक प्रतिष्ठा देणारे आणि जिव्हाळ्याचे प्रतिक ठरणारे सर्व सोयींनीयुक्त छोटेखानी परंतु सुसज्ज असे सभागृह सिडको भवनच्या सातव्या मजल्यावर आकाराला आले. **शुक्रवार, दि. २० मार्च २००९** रोजी सिडकोचे व्यवस्थापकीय संचालक **श्री. जी. एस. गिल्ल** यांच्या हस्ते व सहव्यवस्थापकीय संचालक **श्री दिलीप जाधव** यांच्या प्रमुख उपस्थितीत त्याचे औपचारिक उद्‌घाटन करण्यात आले.

या प्रसंगी उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक व सहव्यवस्थापकीय संचालक यांनी सिडको भवनातील या सांस्कृतिक कलामंदिराची बारकाईने पाहणी करून निर्मितीविषयी समाधान व्यक्त केले.

सदर वास्तुशिल्प नियत कालावधीत पूर्ण होण्याकरीता मुख्य अभियंता आणि महाव्यवस्थापक (तांत्रिक) **श्री. एस. सी. देशपांडे** व मुख्य वास्तुशास्त्रज्ञ तथा नियोजनकार **श्री. दिलीप शेकदार** आणि अतिरिक्त मुख्य वास्तुशास्त्रज्ञ **श्री. ए. के. सोहोनी** यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांच्या चमूने निरातिशय परिश्रम घेतले, त्यांत कार्यकारी अभियंता **श्री. डी. एच. परमार**, सहाय्यक कार्यकारी अभियंता **श्री. डी. जे. जरीवाला**, सहाय्यक अभियंता (न. मुं.) **श्री. व्ही. बी. साळुंके**, कार्यकारी अभियंता (विद्युत) **श्री. एस. आर. कासारे**, सहाय्यक कार्यकारी अभियंता (विद्युत) **श्री. टी. एल. परब** व **श्री. एस. पिरामपल्ली** या अधिकाऱ्यांचा समावेश होता.











# सिडको नवी मुंबई फेस्टिव्हल २००९: सिडको अधिकारी व कर्मचाऱ्यांचे भरीव योगदान

सिडकोने २३ जानेवारी ते २६ जानेवारी २००९ या कालावधी नवी मुंबई महोत्सवाचे आयोजन केले. या महोत्सवाच्या अनुषंगाने विविध सामाजिक-सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाचा एक भाग



म्हणून 'Glimpses of Navi Mumbai' या छायाचित्र प्रदर्शनाचे आयोजन सीबीडी बेलापूर येथिल अर्बन हाटमध्ये करण्यात आले होते. नवी मुंबईचा मागील ३८ वर्षांत झालेला विकास आणि या महानगराचे वेगळेपण दर्शवणाऱ्या



छायाचित्रांचा समावेश या प्रदर्शनात होता.

या प्रदर्शनाकरिता **श्री. इसाक किहिमकर, श्रीमती शुभलक्ष्मी, श्रीमती योगिता पेडणेकर, श्री. वरद गिरि, श्री. हेमंत त्रिपाठी, श्री. मिखिल भोपळे, श्री. अजित देशमुख, श्री. सुजित नरवडे, श्री. रुतुराज, श्री. जगतदीप सिंग** आणि **श्री. दिनकर सामंत** यांचे सहकार्य लाभले.

नवी मुंबई महोत्सवाच्या आयोजनात सिडकोच्या सर्व विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सक्रीय योगदान लाभले. यात सिडको सुरक्षा विभाग, सामाजिक सेवा विभाग तसेच व्यवस्थापकीय संचालक यांचे कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांचा प्रामुख्याने समावेश होता. सिडकोतील सर्व सुरक्षा सहाय्यक व सुरक्षा रक्षक यांनी नवी मुंबई महोत्सवाच्या यशस्वीतेकरिता बंदोबस्तकामी सूरक्षेची चोख व्यवस्था पार पाडली त्यात सुरक्षा विभागातील सुरक्षा अधिकारी **श्री. ए. आर. शिंदे,** सहाय्यक सुरक्षा अधिकारी **श्री. के. एल. भगत** (पनवेल), **श्री. व्ही. जी. यादव** (खारघर), **श्री. एस. जे. देशमुख** (वाशी), **श्री. एन. डी.**





**सोनावणे** (ऐरोली), **श्री. बी. के. मुल्ला** (सीबीडी), **श्री. बी. के. पाटील** (नेरुळ) व **श्री. आर. एस. सुरवसे** (सीबीडी) आदी कर्मचारी होते. तसेच सामाजिक सेवा विभागातील मुख्य सामाजिक सेवा अधिकारी **श्रीमती रीमा दिक्षित,** सहाय्यक सामाजिक सेवा अधिकारी **श्री. प्रमोद जाधव, श्री. संजय ढोले,** कार्यक्रम निरीक्षक **श्री. राम पाटील,** कार्यालयीन सहाय्यक **श्रीमती योगिता चव्हाण** व **श्री. नितांत भोळे** यांचे सहकार्य लाभले.

यांचेसोबतच व्यवस्थापकीय संचालकांच्या कार्यालयातील व्यवस्थापकीय संचालकांचे स्वीय सचीव **श्रीमती इवलीन डिसिल्वा,** स्वीय सचीव **श्री. मधुकर एस. डोळस,** लिपिक **श्री. चंद्रकांत जी. कानडे, श्री. मनोज डी. सवैय्या, श्री. वासुदेव एन. भगत, श्री. सोमनाथ पाटील** व **श्री. विनायक बी. सावंत** यांचे सहकार्य महत्वपूर्ण होते. आणि त्याचबरोबर अभियांत्रिकी विभागातील सर्व अभियंत्यांनीही भरीव योगदान दिले.

## खांदा कॉलनी, नवीन पनवेल व नेरुळ पामबिच मार्गालगतच्या अनधिकृत बांधकामांवर सिडकोची धडक कारवाई

सिडकोच्या अतिक्रमणविरोधी पथकाने खांदा कॉलनी, नवीन पनवेल, सेक्टर-१३ व सेक्टर-३४, नेरुळ येथील पामबीच मार्गालगत करण्यात आलेली अनधिकृत बांधकामे दोन स्वतंत्र मोहिमांद्वारे जमिनदोस्त केली.

**दि. ७ मार्च २००९** रोजी खांदा कॉलनी, सेक्टर-१३, नवीन पनवेल येथे अनधिकृतरीत्या बांधण्यात आलेल्या व्यायाम शाळेवर निष्कासनाची कारवाई करण्यात आली.



सदर प्रभागाच्या लोकप्रतिनिधींनी सिडकोला सदर बांधकामाची सूचना देणारे पत्र पाठविले होते. त्या अनुषंगाने सिडकोच्या अनधिकृत बांधकाम विरोधी पथकाला कारवाईचे आदेश देण्यात आले. त्यानुसार या निवासी उपयोगाकरीता राखीव असणाऱ्या ११९ चौ.मी. एवढ्या क्षेत्रावर करण्यात आलेल्या बांधकामावर एमआरटीपी ॲक्ट ५४/१ नुसार नोटीस बजावून संबंधितांना सूचित करण्यात आले. तद्नंतर कसलाही प्रतिसाद न मिळाल्याने पुरेशा सुरक्षाबळासह ही कार्यवाही पार पाडण्यात आली.



तसेच दुसऱ्या व्यापक कारवाईत, **दि. १२ मार्च २००९** रोजी नेरुळ येथील क्षेत्र क्र. ३४ पामबिच मार्गाजवळील **बालिशाहबाबा दर्गा** व **समुद्रेश्वर मंदिरात** करण्यात आलेली अनधिकृत

बांधकामे उद्ध्वस्त करण्यात आली. यात नेरुळ नगरातील मौजे करावे येथील सर्व्हे क्र. २२८ व २२९ या जमिनीवरील बालिशाहबाबा दर्ग्याच्या मूळ मजारीचे बांधकाम सोडून करण्यात आलेली कच्च्या व पक्क्या स्वरूपातील अनधिकृत बांधकामे निष्कासित करण्यात आली. तसेच दर्ग्याच्या मागील बाजूस असणाऱ्या समुद्रेश्वर मंदिरातील मूळ बांधकाम वगळता झालेले इतर कच्च्या व पक्क्या स्वरूपातील बांधकामही निष्कासित करण्यात आले. अतिशय संवेदनशील क्षेत्रांवरील सदर कारवाई शांततेत पार पाडण्याकरिता अतिशय सूत्रबद्ध व शिस्तबद्ध नियोजन करण्यात आले होते. तसेच सुरक्षेची कडेकोट व्यवस्थाही करण्यात आली होती. नेरुळ येथिल कारवाईकरिता ३३ पोलीस अधिकारी, २२६ पोलीस कर्मचारी, ५३ महिला कर्मचारी व ४० एसआरपीच्या ताफ्यासह ४ जेसीबी मशिन्स, २ ट्रक, १७ जिप्स व ५० मजुरांचा सहभाग होता.

या कारवाईकरिता नवी मुंबई महानगर पालिकेतर्फे **श्री. एन. टी. जाधव** व सहाय्यक पोलीस आयुक्त **श्री. पुरुषोत्तम कराड** यांचेही सहकार्य लाभले. नेरुळ येथिल अतिशय जोखमीच्या व संवेदनाशील क्षेत्रांवरील व खांदा कॉलनी येथील कारवाई शांततापूर्ण यशस्वी करण्याकरिता **श्री. सुमंत भांगे,** मुख्य नियंत्रक अनधिकृत बांधकामे यांच्या नेतृत्वाखाली **श्री. एस. डी. गोसावी, श्री. दिलिप भोईर, श्री. नितीन कांबळी, श्री. वैती, श्री. दिलीप गांगुर्डे, श्री. रावसाहेब देवकर, श्री. रावसाहेब सुरवसे,** सहाय्यक सुरक्षा अधिकारी, **श्री. तांडेल** व अनेक सुरक्षा कर्मचाऱ्यांनी अथक परिश्रम घेतले.

## सिडको कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, नवीन औरंगाबाद - नूतन जागेत स्थलांतर



सिडको कर्मचारी सहकारी पतसंस्था मर्यादित, नवीन औरंगाबाद या कर्मचाऱ्यांच्या सहकारी पतसंस्थेचे नवीन शहरे- औरंगाबाद, नाशिक, नांदेड तसेच, नवी मुंबई प्रकल्पातील २२५ सदस्य संख्या असलेल्या व वार्षिक १.०० कोटी उलाढाल असलेल्या संस्थेस जागा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी सिडको व्यवस्थापनास करण्यात आली होती. पतसंस्थेकडून सभासदास ८% या अल्पव्याज दराने रु. १.०० लाख मर्यादेपर्यंत व तातडीचे रु. १०,०००/- कर्ज उपलब्ध करून देण्यात येत आहे. संस्थेच्या जागा मागणीची दखल घेऊन सिडको व्यवस्थापनाने उद्योगभवन कार्यालयातील प्रवेशद्वारालगत यापूर्वीची कॉसमॉस बँकेची विस्तारीत कक्षाची जागा पतसंस्था कार्यालयास उपलब्ध करून दिली. या प्रशस्त जागेत पतसंस्थेचे कार्यालय २७-०३-२००९ रोजी गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर स्थलांतर करण्यात आले. सदर जागेत संचालक मंडळाच्या बैठकीकरीता बैठक व्यवस्था, संगणक कक्ष व सदस्यांकरिता कक्ष उपलब्ध करण्यात आला आहे.



सिडको कर्मचारी सहकारी पतसंस्थेच्या नूतन कार्यालयाचे उद्‌घाटन **सौ. मनिषा जायभाये,** प्रशासक यांच्या हस्ते संपन्न झाले. कार्यक्रमप्रसंगी प्रशासक **सौ. मनिषा जायभाये** यांनी पतसंस्थेच्या कार्याची माहिती घेऊन संस्थेच्या कार्याची प्रशंसा केली. यावेळी पतसंस्थेचे अध्यक्ष **श्री. श्रीधर इंगळे,** उपाध्यक्ष **श्री. जनार्दन पाटील,** सचिव **श्री. संजय औताडे** तसेच सर्व सन्माननिय संचालक उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी **श्रीमती डि. डी. देशपांडे, श्रीमती एस. एस. माढेकर, श्री. के. डी. जाधव,** संस्थेचे हिशोबनिस **श्री. पाठक** आदींनी परिश्रम घेतले.

## सिडकोचे अधिकारी, कर्मचारी अभिनंदनास पात्र

महामंडळाने मागील ३ वर्षाच्या कार्याचा उत्कृष्ठ आलेख असणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना अतिरिक्त पगारवाढ देण्याची नवीन योजना जाहीर केली असून याअंतर्गत यावर्षी एकूण ५२ अधिकारी व कर्मचाऱ्यांना अतिरिक्त पगारवाढ देण्यात आली आहे.

**श्री. एम. आर. खर्चे** (अधिक्षक अभियंता) • **श्री. पी. सुरेशबाबू** (वरिष्ठ नियोजनकार), **श्री. एस. सी. देशपांडे** व **श्री. के. वाय. जोशी** (अति. मुख्य अभियंता) • **श्री. पी. एन. म्हात्रे,** (विकास अधिकारी) • **श्री. बी. के. कोळी** (सहा. विकास अधिकारी) • **श्रीमती आर. आर. सावंत** (क्षेत्राधिकारी) • **श्री.आर. बी. पाटील, श्री. बी. बी. नेमा, श्री. अे. के. वर्मा** व **श्री. एस. अे. नाडगौडा** (कार्यकारी अभियंता) • **श्री. व्ही. आर. धमाल, एस. डी. राणे** व **श्री. एस. व्ही. वैद्य** (सहा. अभियंता) • **श्री. जे. एन. मेस्त्री, श्री. जी. एस. अग्रवाल** व **श्री. आर. पी. शर्मा** (सहा. कार्यकारी अभियंता) • **श्री. जी. एस. अग्रवाल** (सहा. अभियंता) • **श्री. जी. आर. साटोटे** (कार्यालयीन सहाय्यक) • **श्री. एस. एस. शिरोडकर** (सहा. नियोजनकार) • **श्री. व्ही. जी. वेदूला** (सहायोगी नियोजनकार) • **श्री.बी. के. मुल्ला** (सहा. सुरक्षा अधिकारी) • **श्री. एस. एस. पळशीकर, श्रीमती आर. एस. गुराम** व **श्रीमती पी. बी. साबळे** (कार्यालयीन सहाय्यक) • **श्री. पी. जी. भोपी** (लेखा सहाय्यक) • **श्री. अे. के. झेले** (लेखापाल) • **श्री. एस. आर. राईकवार** (सुरक्षा रक्षक) • **श्री. एस. व्ही. मोघे** व **श्री. व्ही. पी. पाटील** (निम्नश्रेणी लघुलेखक) • **श्री. एस. पी. देशपांडे** (आरेखक) • **श्री. एच. एल. नाचनेकर** (ड्रायव्हर) • **श्री. व्ही. बी. सावंत** (चालक) • **श्री. व्ही. एन. अच्युतन, श्री. व्ही. पी. सदानंद, श्री. ओ. व्ही. रामदासन, श्री. ई. एम. मेनन, श्रीमती एम. एस. डोळस** व **श्री. आर. के. चांदोरकर** (उच्चश्रेणी लघुलेखक) • **श्री. एम. एस. डोळस, श्री. सी. ए. फिलिफ, श्रीमती एन. एस. शेट्टे, श्री. एस. सी. महाजन, श्री. एम. एम. मुरलीधरन, श्री. टी. आर. कौर** व **श्री. के. आर. शिवराजन** (निम्नश्रेणी लघुलेखक) • **श्री. व्ही. एल. म्हात्रे, श्री. एम. आर. शेकोकर** व **श्रीमती एम. जी. पाटील** (लिपिक/टंकलेखक) • **श्री. एस. एस. कर्पे** (आरेखक), **श्रीमती एस. एस. कुसूरकर** व **श्रीमती सी. एस. कक्कर** (स्वागतिका-दूरध्वनी संचालिका).

सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे हार्दिक अभिनंदन.



## Mr. A. S. Patil appointed as Arbitrator by the International Centre for Alternative Dispute Resolution (ICADR)

The International Centre for Alternative Dispute Resolution (ICADR) has included **Mr. A. S. Patil** - Addl. Chief Engineer (Civil) in its Panel of Arbitrators/



Mediators. Mr. Patil will act as an Arbitrator/ Mediator as and when suitable case is referred by the parties to ICADR.

CIDCO is extremely proud and happy about Mr. Patil's achievement and extends its best wishes for all his future endeavours.

## सिडको कर्मचाऱ्यांना सोसायटी भूखंडाच्या मागणीस शासनाची मान्यता

सिडको कर्मचाऱ्यांच्या जिव्हाळ्याचा विषय असणाऱ्या सोसायटी भूखंडांच्या मागणीला शासनाने मान्यता दिली असून 'स्नेहपुष्प' व 'प्रभात सहकारी गृहनिर्माण संस्था' व इतर कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थांना भूखंड मिळण्याच्या मागणीसंदर्भात सिडको एम्प्लॉईज युनियनने सातत्याने पाठपुरावा केला होता.

शासनाच्या या निर्णयाविषयी समाधान व्यक्त करून सिडको एम्प्लॉईज युनियनचे अध्यक्ष **श्री. निलेश तांडेल** व सरचिटणीस **श्री. मिलिंद बागूल** यांनी मुख्यमंत्री **मा. ना. श्री. अशोक चव्हाण,** प्रधान सचिव **श्री. तिवारी, श्री. हिवलकर,** सिडकोचे अध्यक्ष **मा. श्री. नकुल पाटील,** उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक **श्री. जी. एस. गिल्ल** आणि सहव्यवस्थापकीय संचालक **श्री. दिलीप जाधव** यांच्या सहकार्याबद्दल समस्त कर्मचाऱ्यांच्या वतीने कृतज्ञता व्यक्त केली.

## पदोन्नती

सिडको महामंडळात मार्च २००९ मध्ये पुढील कर्मचारी व अधिकाऱ्यांची पदोन्नती देण्यात आली आहे.

**पदोन्नती**

**लिपिक/टंकलेखक:** **श्री. ए. बी. सोनजे.**

**लेखा सहाय्यक:** **श्रीमती ए. आर. धोडपकर, श्री. एस.एन. पाटील, श्री. बी. आर. तांडेल व श्री. एन. व्ही. सुतार.**

**दफ्तरी:** **के.एस. जाधव, ए. एच. गोवारी.**

**नाईक:** **व्ही. बी. पाटील.**

पदोन्नती प्राप्त सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांचे सिडको परिवारातर्फे हार्दिक अभिनंदन !

## श्रद्धांजली

सिडको महामंडळातील कार्यकारी अभियंता (खारघर हाऊसिंग-२) या पदावर कार्यरत **श्री. ए. के. वर्मा** यांचे बुधवार दि. २४ मार्च, २००९ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.



तसेच शिपाई पदावर काम करणाऱ्या **श्रीमती बेबी काशिनाथ नाईक** यांचे शुक्रवार दि. २७ मार्च २००९ रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्या स्मृतींना वंदन करण्यासाठी



**मंगळवार दि. ३१ मार्च २००९ रोजी** दुपारी १२:३० वा. शोकसभा सिडको भवन प्रवेशद्वाराजवळ आयोजित करून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली.



# निरोप समारंभ



**श्री. पी. व्ही. सतीश**



**श्री. श्रीराम एम. वाळींबे**



**श्री. श्रीधर डी. इंगळे**



**श्री. गणेश एन. पारगांवकर**



**श्री. आसाराम अे. गाढे**

**श्री. पी. व्ही. सतीश** (वरीष्ठ अर्थशास्त्रज्ञ), **श्री. श्रीराम महादेव वाळींबे** (सहाय्यक विकास अधिकारी), **श्री. श्रीधर दामोदर इंगळे** (सहाय्यक लेखाधिकारी), **श्री. गणेश नामदेव पारगांवकर** (वरीष्ठ पंपचालक) व **श्री. आसाराम अप्पा गाढे** (वाहन चालक) हे आपल्या प्रदीर्घ सेवेनंतर **३१ मार्च, २००९ रोजी** निवृत्त झाले. प्रशासनातर्फे त्यांना भावपूर्ण निरोप देण्यात आला.

या प्रसंगी भविष्य निर्वाह निधी, इतर सामाईक रकमांचे धनादेश, भेटवस्तू, शाल व श्रीफळ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. या निरोप समारंभा प्रसंगी सिडको कर्मचारी संघटना, बी. सी. एम्प्लॉईज असोसिएशन, इंजिनियर्स असोसिएशन, ऑफिसर्स असोसिएशन व सिडको प्रकल्पग्रस्त कर्मचारी वेल्फेअर असोसिएशन यांनी त्यांना भावी आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

संपादक, मुद्रक व प्रकाशक: मोहन निनावे, जनसंपर्क अधिकारी, सिडको यांनी सिडको लिमिटेड करीता ही गृहपत्रिका इन-हाऊस स्टुडिओ, सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई-४०० ६१४, महाराष्ट्र-मार्फत छापून सिडको भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४, महाराष्ट्र-येथे प्रकाशित केली. (खाजगी वितरणासाठी).
या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी सिडको व्यवस्थापन सहमत असेलच असे नाही.